# निर्वाचनाचे मृगजळ

## चंद्रशेखर पुरंदरे

नेमेचि येतो मग पावसाळा या न्यायाने युरोपमधील काही देशांत मे महिन्यामध्ये निवडणुका पार पडल्या.

फ्रान्समध्ये अध्यक्षीय, ग्रीस व सर्बियामध्ये सार्वत्रिक, ब्रिटनमध्ये स्थानिक नगरपालिकांच्या आणि जर्मनीत एका राज्यात निवडणुका झाल्या. सगळ्याच युरोपला आर्थिक मंदीचा तडाखा बसलेला आहे. परवापरवापर्यंत कल्याणकारी धोरणे राबवणारी राष्ट्रे सार्वजनिक सेवांतून त्वरेने काढता पाय घेत आहेत. सार्वजनिक क्षेत्राचा संकोच किंवा खासगीकरण, बेकारीत वाढ, खासगी क्षेत्रातील उद्योग बंद पडणे, आर्थिक वाढ शून्यावर येणे, वैयक्तिक व राष्ट्रीय कर्जबाजारी व दिवाळखोरी वाढणे, आहेत त्या नोकऱ्यांची अशाश्वती असे सर्व परिणाम दिसत आहेत. त्यामुळे सामाजिक असंतोष आहे. या पार्श्वभूमीवर या निवडणुका झाल्या. फ्रान्स, ब्रिटन व जर्मनीमध्ये सत्तारूढ पक्ष हरले. सर्बिया व ग्रीसमध्ये ते पिछाडीला गेले पण नवी युती सत्तेवर येण्याचे चित्र मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत तरी संदिग्ध आहे.

सामान्यत: आर्थिक व सामाजिक अस्थिरतेच्या काळात उजव्या शक्ती प्रबळ होतात. त्या राष्ट्रवाद, वंशवादाला आवाहन करतात, वर्णद्वेषाला खतपाणी घालतात आणि एकसंध आदर्शवाद देशाला स्थैर्य देऊ शकेल असे आश्वासन देतात. युरोपमध्ये सगळीकडेच असे पक्ष स्थापन होत आहेत आणि निवडणुकांत लक्षणीय यश मिळवत आहेत.

अमेरिकेतही 'टी पार्टी' हा रिपब्लिकन पक्षाच्या आदर्शवादाच्या जवळचा जहाल गट गेली चार-पाच वर्षे सबळ होताना दिसतो. आधीच उजव्या असणाऱ्या रिपब्लिकन पक्षाच्या खासदारकीचे तिकीट मिळवण्यासाठी मे च्या दुसऱ्या आठवड्यात इंडियाना राज्यात पक्षांतर्गत निवडणुका झाल्या. रिपब्लिकन पक्षात विरोधी डेमोक्रॅटिक पक्षाशी संवाद करून राष्ट्रहिताचे धोरण आखावे अशा विचारसरणीचा एक मवाळ गट आहे. गेली ३५ वर्षे रिचर्ड लुगर असे संवादी धोरण श्रेयस्कर मानणारा खासदार. त्याला टी पार्टी गटाच्या उमेदवाराने हरवले व खासदारकीच्या निवडणुकीचे तिकीट मिळवले.

फ्रान्समध्ये हेच दिसून आले. तेथील अध्यक्षीय निवडणुकीत विद्यमान अध्यक्ष निकोलस सार्कोझीविरुद्ध समाजवादी पक्षाचा फ्रान्स्वाज ओलांद हे प्रमुख उमेदवार होते. एका अतिउजव्या पक्षाच्या (राष्ट्रवादी) नेत्या मारिन ल पेन, एका मध्यममार्गी पक्षाचा नेता व एका डाव्या पक्षाचा नेता हे इतर प्रमुख उमेदवार होते. फ्रेंच अध्यक्षीय निवडणुका दोन टप्प्यांत होतात. पहिल्या फेरीतील पहिल्या दोन उमेदवारांत अंतिम लढा होतो. पहिल्या फेरीत ओलांद सार्कोझीपेक्षा जरा आघाडीवर होता. हे साधारण अपेक्षित होते. अनपेक्षित होता तो ल पेनचा मतदानातील हिस्सा. त्यांना एकूण मतांच्या जवळजवळ वीस टक्के मते मिळाली, म्हणजे एक-पंचमांश फ्रेंच या पक्षामागे गेले. हा पक्ष उघडपणे 'फ्रान्स फ्रेंचांसाठी' म्हणतो. फ्रेंच म्हणजे गोरे फ्रेंच. फ्रान्सच्या उत्तर आफ्रिकेतील ऐतिहासिक वसाहतीतून मोठ्या प्रमाणावर कृष्णवर्णीय आणि अरब १९६० च्या दशकापासून फ्रान्समध्ये आलेले आहेत. त्यांच्या दुसऱ्या, तिसऱ्या पिढ्या अजूनही समाजाच्या परिघावरच आहेत. यांना हाकला, यांच्यामुळे देशाची प्रगती होत नाही, हे सरकारचे जावई आहेत असा या राष्ट्रवादी पक्षाचा ठाकरी थाटाचा प्रचार आहे. त्यात तथ्य नसले तरी वीस टक्के लोकांना त्यात तथ्य वाटले, हे महत्त्वाचे!

या अतिउजव्या पक्षाला वाढता पाठिंबा पाहून सार्कोझीने त्याच्या निवडणूक प्रचारात या पक्षाच्या शिडातील हवा काढून घेण्याचा प्रयत्न केला. गोरेतर 'परकीय' फ्रेंच - विशेषत: मुसलमानांना - लक्ष्य केले. पण या भूमिकेचा त्याला अपेक्षित परिणाम झाला नाही. एकतर ल पेन (आणि त्याआधी पक्षाचे संस्थापक तिचे वडील) हीच भूमिका गेली अनेक वर्षे घेत आहेत. त्यामुळे लोक त्या पक्षाकडे वळले. दुसरे म्हणजे, सार्कोझीच्या पक्षातील उदारमतवादी दुरावले. त्यात पहिल्या फेरीनंतर ल पेन सार्कोझीला पाठिंबा देईल अशी अपेक्षा होती. मग सार्कोझीला कदाचित आघाडी मिळाली असती. पण तिने 'मी कोरी मतपत्रिका टाकणार' असे जाहीर करून समर्थकांनी कोणालाही मत द्यावे असे सुचवले. ११ टक्के मते मिळालेल्या डाव्या पक्षाचे समर्थक ओलांदच्या मागे गेले तर ९ टक्के मते मिळालेल्या मध्यममार्गी पक्षाने अचानकपणे ओलांदलाच पाठिंबा दिला व ओलांद निवडून आला. त्यातही डाव्यांना ११ टक्के मते मिळाली हे लक्षात घ्यावे.

आर्थिक आणीबाणीवरील युरोपियन युनियनच्या धोरणविरुद्ध हे मतदान होते. सार्वजनिक क्षेत्रात कपात न करता राष्ट्रीय उत्पन्न वाढवता येईल असा ओलांदचा दावा आहे. सार्वजनिक क्षेत्रात कपात करणे हे युरोपियन युनियनचे प्रमुख धोरण आखणारे दोघेजण - जर्मनीच्या चॅन्सेलर आंगेला मेर्केल आणि निकोलस सार्कोझी.

त्यामुळे मतदारांनी सध्याच्या गांजवणुकीला त्याला व्यक्तिश: जबाबदार धरले. त्यात त्याची वैयक्तिक प्रतिमा उर्मट होती.

पण ओलांदचा एकूण अननुभव पहाता व त्याचा निवडणूक प्रचारातील एकूण बाज पाहता कोणतेच निश्चित धोरण न घेण्याचे त्याचे धोरण दिसते. त्यामुळे ओबामासारखाच हा भ्रमनिरास पुढ्यात असावा.

ग्रीसमधील आर्थिक परिस्थिती फ्रान्सपेक्षा खडतर आहे. त्या देशाला दिवाळखोरीतून बाहेर काढण्यासाठी युरोपियन युनियनने लादलेल्या अटींमुळे सार्वजनिक सेवांचा अस्त, वाढती महागाई व बेकारी, निवृत्तीवेतन अदृश्य होणे यामुळे हजारोंनी ग्रीक गेले कित्येक महिने रस्त्यावर येत आहेत.

युरोपियन युनियनमधूनच बाहेर पडा, निदान जर्मनी-फ्रान्सची अरेरावी तरी नको असे जनमानस निवडणुकीत दिसले. पण हा असंतोष डावीकडेही जाऊ शकतो आणि उजवीकडेही. म्हणजे एकूणच संदिग्ध भांडवलशाहीही शत्रू ठरू शकते किंवा समोर दिसणारा वेगळ्या वर्ण-वंशाचा समुदायही. त्यानुसार निवडणुकीत डाव्या पक्षाला मोठीच आघाडी मिळाली. मागच्या निवडणुकीत १३ खासदार होते, ते या लोकसभेत ५२ झाले. पराभूत सत्ताधीश पक्षाशी हातमिळवणी करून त्या युतीचे सरकार किंवा प्रमुख विरोधी पक्षाबरोबर त्या युतीचे सरकार हे ठरवण्याइतकी ताकद डाव्या पक्षाला मिळाली. मात्र अशी कोणतीच युती डावा पक्ष करणार नाही असे दिसत आहे. या अनिर्णयातून ग्रीसमध्ये पुन्हा मध्यावधी निवडणुका व अराजकाची लांबण लागण्याची शक्यता असल्याने शेअरमार्केट गडगडले. पण इथेही 'ग्रीस ग्रीकांसाठी' अशा नव-नाझी पक्षाला पहिल्यांदाच २१ जागा मिळाल्या आणि सात टक्के मते मिळाली.

*(निवडून आलेल्या पक्षांची युती होऊ न शकल्यामुळे ग्रीसमध्ये आता १७ जूनला पुन्हा सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत.)*

जर्मनीतील एका राज्यातील निवडणुकीत व ब्रिटनमधील नगरपालिकांच्या निवडणुकीतही सत्ताधारी पक्ष हरले.

सोविएत युनियनच्या विघटनानंतर आधीच्या युगोस्लावियातून फुटून सर्बिया (Serbia), क्रोएशिया (Croatia), स्लोवेनिया (Slovenia) वगैरे वंशावर आधारित देश निर्माण झाले. त्यातल्या सर्बियात स्थानिक, लोकसभा आणि अध्यक्षीय निवडणुका झाल्या. तेथेही अध्यक्षीय निवडणुकीची दुसरी फेरी होणार कारण पहिल्या फेरीत निर्णायक बहुमत कोणत्याच एका उमेदवाराला मिळालेले नाही. अध्यक्ष ठरत नाही तोपर्यंत कोणती युती सत्तेवर येईल हेही सांगता येत नाही. सर्बियात निवडणुकीतील मुख्य मुद्दा युरोपियन युनियनमध्ये सामील होण्याचा होता. प्रमुख पक्षांचा कल सामील व्हावे असा आहे. पण त्याचवेळी ग्रीसमध्ये लोकांचा कौल युनियनमधून बाहेर पडावे हा आहे तर फ्रान्समध्ये युनियन ठीक आहे पण आमच्यावर कपातीची जबरदस्ती नको हा आहे. युरोपियन युनियन असो किंवा युनियनमार्फत धोरण राबवणारी आंतरराष्ट्रीय नाणेनिधी संघटना असो, आजार परवडला पण त्यांची औषधे नकोत हा ग्रीस व फ्रान्समधील कल दिसतो. सर्बिया हा पूर्व युरोपमधील, कम्युनिस्ट इतिहास असणारा देश असल्याने तेथे लोकशाही संपन्न पश्चिम युरोपचे एकेकाळचे ग्लॅमर अजून शाबूत आहे. अधिकृत आकडेवारीनुसार २४ टक्के बेरोजगारी असणाऱ्या देशाला कोणीतरी बाहेरचा वैद्य शोधावा लागणे आवश्यक वाटते.

एकूण चित्र पाहता एक-दोन गोष्टी लक्षात याव्यात. एकतर युरोपियन युनियनतर्फे देशाचे सार्वभौमत्व धोक्यात येते ही फ्रान्स व ग्रीसमध्ये आलेली जाणीव. सार्वभौमत्व फक्त आर्थिक नाही तर सामाजिक, सांस्कृतिकही असते. मग, अशा परिस्थितीत सरकार कोणत्या पक्षाचे येते हा एक उपचार राहतो आणि हा उपचार ठरवणारी निवडणूक आणखीच दुय्यम उपचार राहतो. तरीही निवडणुकीमुळे राजकीय नेतृत्व (त्या नेतृत्वाची दिशा नव्हे) ठरत असल्याने आता (ब्रिटन सोडता) उर्वरित युरोपचे भवितव्य ठरवण्याची फ्रान्स-जर्मनीची क्षमता संपुष्टात आली आहे. फ्रान्समधून सार्कोझीची हकालपट्टी व जर्मनीतील अंतर्गत निवडणुकीतील मेर्केलच्या पक्षाचा पराभव या घटनांमुळे मेर्केलला आतून व बाहेरून दणका बसला आहे. सार्वजनिक खर्च कमी करा, सरकारी नोकऱ्यात कपात करा ही धोरणे राबवणे लोकांना पचत नाही हे उघड झाले आहे. ते लोकांना का पचत नाही तर त्यांच्या डोळ्यादेखत अतिश्रीमंत घराणी, बँकर अब्जाधीश होतच राहतात. म्हणजे काटकसर करायची ती मध्यम किंवा खालच्या वर्गाने. चैन करायची ती उच्च वर्गाने आणि मुलामा मात्र आर्थिक शिस्तीचा - हा दांभिकपणा ग्रीकांना किंवा फ्रेंचांना किंवा ब्रिटिशांना असह्य झाला आहे.

पुढचा मुद्दा म्हणजे, निवडणुका या राज्यकर्त्यांपर्यंत संदेश देऊ शकतात. त्यांचेच हात जर बांधलेले असतील तर संदेशाचा उपयोग काय? आपल्याकडे भ्रष्टाचाराने हात बांधलेले असतील, युरोपात आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने हात बांधले असतील. हा निवडणूक प्रक्रियेचा थिटेपणा आहे.

त्याहीपेक्षा खोलात जाऊन पाहता, तात्त्विकदृष्ट्या निवडणूक हे द्वंद्व राहते. तो उजव्या-डाव्यातील सामना म्हटला तर किमान सद्यस्थितीत तरी डावे आणि उजवे हे शब्द बापुडे केवळ वारा झालेले दिसतात. आणि साधनशुचितेच्या दृष्टीने, द्वंद्वाने सामाजिक प्रश्न अधिक बिकट होतील, सुटणे कठीण वाटते.

त्यात भर म्हणून, तथाकथित डाव्या आणि उजव्या आदर्शवादातील परस्परसंवादाची शक्यता संपल्यातच जमा दिसते.

*(पान १५ वर)*

***जगभर,*** *(पान ११ वरून)*

डावे एका वेगळ्याच शब्दरचनेत, जगात वावरतात आणि उजव्यांची संदर्भचौकटच निराळी आहे. आर्थिक नियोजनाचा (तात्त्विक, व्यावहारिक नव्हे) पर्याय याखेरीज समाजाच्या व्याधींवर डाव्या आदर्शवादाकडे काहीच उत्तर दिसत नाही. त्यामुळे त्यांचा सगळा शब्दबंबाळपणा सरकारचे आर्थिक धोरण, सरकारी सेवा, नोकऱ्या यापुरता मर्यादित राहतो. पण गेल्या वीस-पंचवीस वर्षांतील माहिती-तंत्रज्ञानाची भरारी, जागतिकीकरणाचे सांस्कृतिक परिणाम, देशांमधील मोठ्या प्रमाणावर अंतर्गत स्थलांतरण व त्यातून उभे राहणारे नवे प्रश्न यामुळे सामाजिक, वैयक्तिक व सामूहिक अशा अनेक स्तरांवर अस्मिता धोक्यात आल्याची भावना दिसते. मूल्यांच्या अस्तित्वाचे गांभीर्य डाव्या आदर्शवादाला कळत आहे असेच दिसत नाही. आपण 'आपण' म्हणून टिकणार का ही भीती जगात सगळ्याच समाजांत तीव्र होताना दिसत आहे. दुसरीकडे उजवा आदर्शवाद या भीतीला प्रतिगामी, अनैतिहासिक उत्तरे देताना दिसतो. प्रसंगी उत्तरच नसण्यापेक्षा ते अपुरे व अश्रेयस्कर उत्तर परवडले असा लोकांचा कल दिसतो. निवडणूकप्रक्रियेचा थिटेपणा हा.

त्यामुळे डावे-उजवे हे द्वंद्व बाजूला ठेवून, केवळ राष्ट्राच्या सीमांतर्गतच नव्हे तर सामाजिकदृष्ट्या सार्वभौमत्वासाठी आपले प्रश्न आपणच सोडवायला हवेत; डॉक्टरसारख्या बाहेरच्या तज्ज्ञाला बोलावल्यास आर्थिक, सांस्कृतिक व स्वातंत्र्याचे स्वास्थ्य हां हां म्हणता गमवायला लागेल हा धडा या देशांना या निवडणुकांतून मिळालेला दिसतो.

*E-mail - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*